



1 नभरंग

## संपादक

प्रवीण रायबागकर

प्रसाद पालव

अनुराधा पिंगळीकर

वैशाली घाडगे

प्रा .उषा जोशी.

प्रा.डॉ.रजनी अपसिंगेकर

प्रा.श्रीपाद पदे

## सल्लागार

सुधीर सेवेकर

ॲड. उल्हास सावजी

## लेख

प्र.के .अत्रे

दपावली पाटील

साक्षात्कार - रश्मी काळे

मला जरा सूर देता का ?

## कविता

राधिका काळे - गोवा

प्रमोद जोशी -देवगड

यशवंत देव

प्रवीण रायबागकर -कोल्हापूर

नारायण पांडव - छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद )

वैशाली पहुरकर -मुंबई

सुरेखा काणे -औरंगाबाद

डॉ. मंजुषा कुलकर्णी -मुंबई

डॉ. विजय पांढरीपांडे

**नोट : या अंकातील लेख ,कविता व साहित्य हे पाठवलेले असते त्यामुळे त्याच्या व्याकरणाची जबाबादारी त्या त्या लेखकाची राहील.**

**संपादक यातील साहित्याशी सहमत असतील असे नाही.**





2 नभरंग



# अंकात काय वाचाल


७ सुरास्त

१३ प्र.के .अत्रे

१४ स्वर लता दै.लोकमत

१५ लता मंगेशकर

१७ प ह्यदयनाथ मंगेशकर यांनी सांगितलेली आठवण

१८ धुळे जिल्ह्यात बागडलेल्या लता दीदी -दिपावली पाटील

२० साक्षात्कार - रश्मी काळे

२६ मला जरा सूर देता का ? - श्रीपाद पदे


## कविता


राधिका काळे - गोवा

प्रमोद जोशी -देवगड

यशवंत देव

प्रवीण रायबागकर -कोल्हापूर

नारायण पांडव - छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद )

वैशाली पहुरकर -मुंबई

सुरेखा काणे -छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद )

प्रा.डॉ.मंजुषा कुलकर्णी -मुंबई

डॉ. विजय पांढरीपांडे -नागपूर






3 नभरंग

# संपादकीय



नमस्कार २८ सप्टेंबर लतादीदींचा त्या  नसतानाचा पहिला जन्म दिवस त्याला आता जयंती म्हणावं लागेल त्यांना जगभरातून शुभेच्छा मिळत असत प्रत्येकाच्या घरामध्ये आज एक पोकळी जाणवत आहे कुठेतरी प्रत्येकाच्या    मनाच्या कोप-्यात त्या गेल्याच दुःख दिसत आहे एकही व्यक्ती असा भेटला नाही की तो व्यक्त झाला नाही मग ते गाण्यांवरती बोलणं असेल स्वभाव असेल त्यांच्या कर्तुत्व असेल बरच काही नभरंगाच्या माध्यमातून त्या  गेल्यानंतर  ब-याच जणांनी श्रद्धांजली संदेश काही आठवणी कविता पाठवल्या होत्या प्रत्येकानेच   अंक प्रकाशित केले असल्याने आपण असे ठरवले की हे सर्व साहित्य २८ सप्टेंबरला आपण प्रकाशित करू पुन्हा त्यांच्या आठवणीत रमून जाऊ ह्याच प्रत्येकासाठी आठवणी असतील आपल्यासाठी प्रेरणा असेल आणि
पुन्हा एकदा त्याच्यात रमता येईल.

हा अंक कसा वाटला नक्की कळवा

धन्यवाद





4 नभरंग

> कल भी सुरज निकलेगा, कल भी पंछी गायेंगे,
> सब तुझको दिखाई देंगे, पर हम ना नजर आयेंगे.
>
> लता दीदींच्याच गीतातील हे एक कडव आज पुन्हा पुन्हा मन अस्वस्थ करुन जात आहे. आज दीदी गेल्या, आता कधीही त्या आपल्याला दिसणार नाहीत पण तरीही आपल्या हजारो गीतांच्या माध्यमातून ही मराठमोळी खान्देश कन्या जगभरातील रसिकांच्या मनात अजरामर राहील यात शंका नाही.



## भारतरत्न

आपल्या महाराष्ट्राचं भुषण त्यातल्या त्यात खान्देशच वैभव असलेल्या लता दिदींमुळे भारताच नाव सांगीतिक क्षेत्रात जगाच्या कानकोप-्यात पोहचलं. त्यांच्या सुरेल आवाजामुळेच भारतीय गायन क्षेत्र जगात एका विशिष्ट उंचीवर पोहचलं आहे. लता दीदींचा जीवन प्रवास थक्क करणारा आहे.

आपल्या जादुई अशा सुमधुर आवाजाने अवघ्या विश्वभरातील अब्जावधी रसिकांना मंत्रमुग्ध करणा-या मराठमोळ्या गायिका भारतरत्न लता मंगेशकर यांचा जन्म त्या काळातील प्रसिध्द रंगमंच कलाकार मास्टर दिनानाथ मंगेशकर आणि शेवंती (माई )मंगेशकर यांच्या पोटी पहीले अपत्य म्हणुन दि. २८सप्टेंबर १९२९ रोजी मराठी परीवारात ईंदौर येथे झाला. त्यांचे मुळगाव सातारा हे असुन त्यांचे आजोळ (मामाचे गाव ) बागलाण तालुक्या जवळील थाळनेर हे आहे. लता, उषा, आशा, मिना आणि भाऊ ह्रदयनाथ म्हणजे मंगेशकर कुटुंबाचे पंचरत्न होय. वयाच्या पाचव्या वर्षापासुनच लता दिदींच्या सुमधुर आवाजाची कल्पना वडील दिनानाथ मंगेशकरांना येऊ लागली होती.

त्यामुळे त्या वयापासुनच दिदींना गायनाचे धडे आपल्या घरातुनच मिळ




5 नभरंग



लागले होते. ७ व्या वर्षी त्यांनी एका नाटकासाठी प्रथमतः गायन केले. त्यानंतर वयाच्या ९ व्या वर्षी किती हसाल ह्या मराठी चित्रपटातसाठी त्यांनी सर्वप्रथम बालगीतासाठी पार्श्वगायन केले. त्यानंतर अनेक छोट्या मोठ्या चित्रपटात त्यांना गायनाची संधी मिळाली परंतु ते चित्रपट एवढे चालले नाहीत...... हाय रे दुर्दैव वयाच्या १३ व्या वर्षी वडील दिनानाथ मंगेशकर यांचे ह्मदयविकाराच्या तिव झटक्याने निधन.... त्यांच्या अकाली निधनाने लतादिदींच्या आई माई मंगेशकर यांना मोठा मानसिक धक्का बसल्याने त्या आजारी पडल्या तेव्हा कुटुंबाची संपुर्ण जबाबदारी १३ वर्षीय लता मंगेशकरांवर येउन पडली. संपुर्ण कुटुंबाची हेळसांड होऊ लागली दोन वेळेसच्या जेवणाची

देखील पंचायत होउ लागली त्यावेळी दिनानाथ मंगेशकरांचे जवळचे मित्र मास्टर विनायक यांनी संपुर्ण मंगेशकर कुटुंबीयाला खुप मदत केली व त्यांना मुंबईत आणले. कुटुंबाला पुढे आणण्यासाठी लता दिदींनी मिळेल ते काम स्विकारले. सुरुवातीच्या काळात तर दिदींनी साड्यांच्या मिल मधे देखील काम केले. मास्टर विनायक यांची सिनेसृष्टीत चांगली घसरट होती त्यामुळे त्यांनी लतादिदींना एका नायिकेच्या रुपात सिनेसृष्टीत आणले. परंतु मेक अप करणे, अभिनय करणे हे

दिदींना आवडत नसल्यामुळे त्यांचे मन लागत नव्हते पण तरीही कुटुंबासाठी त्यांना हे करावेच लागत होते. एके दिवशी शुटींगच्या आधी सेटवर दिदी सहज एक गाण गुणगुणत होत्या तेव्हा त्यांचा आवाज मास्टर गुलाम हैदर यांनी ऐकला. मास्टर गुलाम हैदर म्हणजे त्या काळातील प्रसिद्ध गीतकार आणी लेखक होते.

त्यांना दिदींचा आवाज एवढा आवडला कीं ते ताबडतोब दिदींना एका मोठ्या संगीतकाराकडे घेऊन गेले. तेव्हा त्या संगीतकाराने त्यांच्या मंगेशकर ह्या मराठी आडनावावर आक्षेप घेत ‘मंगेशकर याने मराठी हो? वो क्या है महाराष्ट्र के लोगो के बोलो मे दाल चावल की बु होती है, और वैसे भी आपकी आवाज तो बहोत पतली है, यह आवाज नही चलेगी‘ असे म्हणुन टर उडवली.

लता मंगेशकरांना ही गोष्ट खुप खटकली. त्यांचा स्वाभीमान दुखावल्याने त्या तात्काळ तेथुन रडत निघुन गेल्या. मास्टर गुलाम हैदर यांनाही ही गोष्ट खुप खटकली त्यांनी मग लता दीदींना शांत करत संगितले की, ‘देख लता तेरी आवाज मे जो मधुरता है ना वो किसिकी भी आवाज मे नही है, और हा मेरी एक बात हमेशा याद रखना भविष्य मे तुम्हे ऐसे बहोतसे निंदक मिलेंगे तब तु उनकी बात का बुरा मत मानना और उनकी बातो को हंसकर टाल देना आगे चलते रहना और गाते ही रहना देख एक दिन तुम्हारी यह आवाज ही तुम्हारी पहचान बन जाएंगी और इस दुनिया मे तुम्हारा बहुत नाम होगा‘ अस सांगुन त्यांनी

दिदींना स्वत:च्या पिक्चरमधे गायनाची संधी दिली. सन १९४२ मधे हिंदी फिल्म मजबुर मधील दिल मेरा तोडा हे गित म्हणजे लता दिदींच्या हिंदी सिनेमातील पहीले गीत होय. त्यानंतर मात्र दिदींनी मागेवळुन बघीतले नाही. सन १९४९ मधील महल मधील आयेगा आनेवाला हे गित म्हणजे

दिदींच्या कारकिर्दीतील पहीले सुपरहिट गीत होय. दिदींचे एकामागुन एक गीत सुपरहिट होत

गेल्याने अल्पावधीतच त्यांचे नाव जगाच्या कान्याकोप-यात पोहचु लागले. त्यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढु लागल्याने त्यांच्याच




6 नभरंग

एका प्रतिस्पर्ध्याने सन १९६२ मधे दिदींना त्यांच्या जेवणातुन स्लो पॉईझन देउन ठार मारण्याचा प्रयत्न केला. मात्र आयुष्याची दोरी मोठी असल्याने व डॉक्टरांच्या यशस्वी प्रयत्नाने त्यांना वाचविण्यात यश आले. जवळपास तीन महिने लता दिदी अंथरूणाला खिळुन होत्या पण त्यानंतर देखील कुठलीही हार न मानता पुन्हा जोमाने त्यांनी आपल्या कारकिर्दीला जोरदार सुरवात केली. सन १९४२ ते आजपर्यंत लता दिदींनी एकुण ५२,००० गीत गाउन जागतिक विक्रम केला. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मधे त्यांच नाव नोंदल गेले. त्यांच्या बावन्न हजार गाण्यांमधे हिंदी, मराठी सहीत इतर ३६भाषांमधील गाणे, भुपाळी, आरत्या, ओव्या, भक्तीगीते यांचाही समावेश आहे. त्यांच्या जिवनात त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आल. देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न ने देखील त्यांना गौरवण्यात आल.

सिनेसृष्टीच्या अगदी सुरुवातीच्या काळापासुनच लता दिदी ह्या क्षेत्रात काम करीत असल्यानेच बॉलिवुड मधील सर्वाधिक मोठी कारकिर्द ही लतादिदींचीच नोंदवली गेलेली आहे. अगदी सुरुवातीच्या काळातील नायिका मधुबाला,नर्गीस, आशा पारेख, जया भादुरी, हेमामालिनी, रेखा,



श्रीदेवी, माधुरी दिक्षीत, काजोल ते आत्ताच्या करीना कपुर, दिपीका पादुकोन, आलीया भट, जान्हवी कपुर ह्या सर्वच नायिकांना त्यांनी आपला आवाज दिला. शतक बदलले... पिढ्या बदलल्या... पडद्या वरच्या नायिका बदलत गेल्या... पण आवाज मात्र एकच राहीला तो म्हणजे लता मंगेशकरांचा. चित्रपटात आईची जागा मुलीने घेतली आणि आता नातीने... पण आई पासुन ते नातीपर्यंत सर्वांना आवाज देणा-या लता मंगेशकर ह्या विश्वातील एकमेव गायिका ठरल्या आणि विशेष म्हणजे त्यांचा आवाज आजही अगदी शेवट पर्यंत तितकाच चिरतरुण ठरला. अस म्हणतात की मध कितीही जुनं झाल तरी त्याच्यातील गोडवा मात्र तसाच राहतो... लता दिदींच्या आवाजात हे समीकरण बरोबर लागु पडते... त्यांचे वय जस जसे वाढत गेले तरी त्यांच्या आवाजातील मधुरता मात्र सदैव तेवढीच राहिली. ही खरोखर दैवी देणगीच तर आहे की ज्या वयात माणुस नीट बोलुही शकत नाही त्याच वयात तेवढ्याच उमेदीन आणी मधाळ पणे गात राहण म्हणजे दैवी चमत्कारच म्हणाव लागेल.







अगदी आत्ताच म्हणजे एप्रिल २०१९ मधे पुलवामाची घटना घडली त्यावेळेस पी. एम. नरेंद मोदी यांचे सौगंध मुझे इस मीट्टी की मे देश नही झुकने दुंगा हे गाण म्हणजे एखाद्या सोळा वर्षाच्या तरुणीला सुध्दा लाजवेल अशा शैलीत त्यांनी म्हटल. त्यांच्या सुमधुर आवाजामुळेच पडद्यावरील प्रत्येक नायिकेच सौंदर्य अजुनच खुलुन दिसल.

दिदिंनी प्रत्येक प्रकारातल गाण गायल. फिल्मी गाणी असो किंवा भक्तिगीत असो किंवा मग देशभक्तीपर गीत असो त्यांच्या आवाजाचा कोणीही मुकाबला करु शकले नाही. दिदिंच्या आवाजात द्राक्षाची नशा पण आहे आणि रुद्राक्षाची भक्ती पण आहे, धर्माची भावना पण आहे आणि देश प्रेमाची शक्ती पण आहे. म्हणुनच आज ह्या वयात सुद्धा त्या त्यांच्या जागेवर कायम विराजमान होत्या, त्यांची ती जागा त्या गेल्यावर ही कोणीही घेऊ शकत नाही. लता दिदींच्या स्वभावात एक फार मोठा गुण होता तो म्हणजे त्या सर्वांशीच आदराने बोलयाच्या. समोरची व्यक्ती त्यांच्यापेक्षा वयाने लहान असो किंवा मोठी त्यांच्याशी त्या अगदी विनम्रतेनेच बोलत. तसेच कुठलही गाण गातांना त्या आपल्या पायातील चप्पल काढुन जमिनीला नमस्कार करुन अनवाणीच गाण म्हणत असत. ही त्यांच्या स्वभावातील खुबी त्यांच्या व्यक्तीमत्वाचा आलेख किती उंचावता होता हेच दर्शवीते. गायना बरोबरच समाजसेवेची ही दिर्दीना खुप आवड होती. अगदी जवळच उदाहरण म्हणजे त्यांनी आमच्या सटाणा गावातील कॉलेज वर लांबलांबहुन येणा-या विद्यार्थिनींसाठी तीस लाख रुपये खर्च करुन खास विद्यार्थिनी वसतीगृह उभारले. सटाणा कॉलेजने त्या वसतीगृहाला लता मंगेशकर वसतीगृह हे नाव देउन दिर्दीच्या ह्या समाज कार्याचा गौरव केला. लता मंगेशकर म्हणजे एक अस व्यक्तीमत्व होत की जे आजच्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील रोजच एक अविभाज्य घटक बनलेल आहे. जर माणुस बहिरा नसेल तर दिवसातून कमितकमी चार पाच वेळेस लता दिदिंचा आवाज सर्वांच्या कानावरुन हमखास जातोच. एकतर टिव्हीवर तरी येईल, किंवा मग रिक्षात,

टैक्सीत किंवा स्वतच्या कार मधे १०० त्यांचा आवाज येणार म्हणजे येणारच. माझ्र विचाराल तर माझ्या दिवसाची सुरुवात दिदिंच्या भक्तिगीताने आणि रात्रीचा शेवट त्यांच्या फिल्मी गिताने होतो. अशा ह्या लता दीदी आज आपल्यातून निघून गेल्या, त्यांचे एक गीत रहे ना रहे हम, मेहका करेंगे बनके कली,




8 नभरंग

बनके सबा बाग - ए - वफा मे हे
नेहमी त्यांचे अस्तित्व त्या अजुनही
आपल्यातच आहेत हे दर्शवीत राहील.
आणि हो अजुन एक गोष्ट ती ही
त्यांच्याच गीतात त्या सांगुन गेल्यात
।तुम मुझे यू भुला ना पाओगे, जब
कही भी सुनोगे गीत मेरे, मेरे संग
संग तुम भी गुणगुणाओगे..........

तूच ऊठवले प्रभात समयी
गाऊन भूपाळी छान
तुच निजवलेरात्री आम्हा
अंगाई ग तुझाच मान
बालगिते ती तुझीच एकून
स्वप्नात रमलो विसरून भान
यौवनात केले पदार्पण
तुझीच गाणी ऐकत ऐकत
प्रेम कराया शिकलो मी
विरहात तू, मिलनात तू
लग्नात तू मधुचंद्राच्या वेळी
मनात तू कानात तू
अंकुरल्या प्रेमाच्या साक्षीत
तुझेच गीत ओठावरती
डोहाळ्याला तू बारशाच्या सोहळ्याला तू
संसाराच्या सा-्या क्षणाला तू
मरणा-्याच्या प्रार्थनेत तू
देवाच्या आळवणीत तू
ये मालिक तेरे बंदे हम
सांगणारी तूच,
जन पळभर म्हणणारी तूच
सार जीवन व्यापणा-्या तुला कोटी
कोटी प्रणाम..
तुझ्या त्या मधात भिजलेल्या
स्वरतंतूना सलाम
तूच इतक दिलंयस आम्ही
काय देणार तुला
एक मात्र नक्की जगाच्या
अंतालासारे ध्वनी संपतील,
पण एक स्वर गुंजत राहिल
ओम नमोजी आद्या- - -
आणि देव म्हणतील ही तर
लता जी चिरंजीवी आहे



लता गेली...लता म्हणजे काय आहे हे माहीत नसलेली माझी कलीग म्हणाली त्यान-ुसार 'वय झालं आणि गेली'. मान्य. एक दिवस सर्वांनाच जायचं आहे. पण आमच्या दृष्टीने लता एकटी गेली नाही! ती जाताना आमच्या आयुष्याचा एक लचका तोडून गेली आहे! कायमस्वरूपी भळभळत राहणारी एक जखम देऊन गेली आहे!

मराठीत एक वाक्य अनेकदा ऐकायला मिळतं. 'हा देह अमुक तमुक वर पोसलेला आहे!' ह्या वाक्यातून व्यक्तीच्या जडणघडणी बाबत सांगितलं जातं. आमच्या बाबतीत म्हणायचं तर 'हे आयुष्य इतर काही गोष्टींबरोबर ज्या गोष्टीवर पोसल गेलं ती लता होती'. ती आज जाताना आमची जडणघडण, आमचं आयुष्य ज्यावर उभं आहे त्यातला महत्वाचा एक खांब उखडून घेऊन गेली. त्याला खिळखिळ करून गेली! अनेक पिढ्यांचा आधार खासकन ओढून घेऊन गेली!

कोट्यवधी लोक जन्माला आल्यावर जीची अंगाई ऐकून रडणे थांबवतात, जीची बालगीते ऐकून बालपण समृद्ध करतात, जीची हजारो प्रेम आणि विरह गीते ऐकून तारूण्यातील स्थित्यंतरांचा अनुभव घेतात, वैवाहिक जीवनातील विविध टप्प्यांवर लताच्या गाण्यांच्या साथीने सामोरे जातात, वृद्धापकाळी लताच्याच गाण्यांनी जीव रमवत, आठवणींना उजाळा देतात आणि मृत्यू होताना देखील त्या स्वर्गीय आवाजात हरवून त्यांचा आत्मा अलगद देह सोडतो ती लता! लताची गाणी आणि तिचा आवाज आमच्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आमचं आयुष्य भरून राहिला आहे..होता!



आमच्या लहानपणी बाबांनी panasonic कंपनीचा टू इन


9 नभरंग

वन आणला होता. त्यावर अनेक कॅसेट ऐकत असू. आजही आठवत एक पिवळं कव्हर असलेली कॅसेट होती ज्यात दोन्ही साईडना लताची गाणी होती. पन्नासच्या दशकातील गाणी! आजवर आईच्या तोंडून ऐकत असलेली गाणी पहिल्यांदा लताच्या तोंडून ऐकली आणि त्यात आजतागायत हरवलो! कदाचित लताचा आवाज ऐकून किंवा तिचा फोटो पाहिल्यावर मला आई आठवायचं कारण आईच्या तोंडून लहानपणी ऐकलेली लताची गाणी हेच असेल! तेव्हा झालेल लताच्या स्वर्गीय आवाजाचं गारुड आजवर उतरलं नाही! तिचा आवाज रोजच्या जगण्याचा एक भाग होत होत जगण्याचा आधार कधी झाला ते कळलंच नाही. मन शांत असताना लताची गाणी लावून ब्र्ह्मानंदी टाळी लागली की आपसूक डोळ्यातून पाणी का येतं हे आजवर न उलगडलेलं कोडं आहे! लताचा आवाज ह्यदय हलकेच चिरून आत शिरतो आणि ह्यदयाचे कप्पे कंपन पाऊ लागतात! डोळ्यातून नकळत पाणी वाहू लागतं. ते गाणं विरहगीत असो, भक्तीगीत किंवा प्रेमगीत, लताच्या आवाजाच पावित्र्य आणि आर्तता ऐकणार्याला अंतर्बाह्य सुखावून जातं आणि स्वर्गीय आनंदाची अनुभूती देतात आणि डोळे आपसूक वाहू लागतात!

लता, सचिन, सुनील, अमिताभ, बाळासाहेब, पुल ही आमची श्रद्धास्थानं आहेत. आमच्या जडणघडणीचे स्तंभ आहेत. आमच्या डुदड्ड चा भाग आहेत! आज फक्त लता गेलेली नाही. आमच्या आयुष्याच्या पायाची एक शिला आज लताच्या जाण्याने निखळ्ली आहे. पुल, बाळासाहेब जाताना आमच्या पिढीचं जे नुकसान करून गेले तेच नुकसान परत एकदा लताच्या जाण्याने झालं आहे. आयुष्य परत एकदा डळमळीत झाल्याचं जाणवतंय. ‘साधी राहणी आणि उच्च विचारसरणी‘ हा वाक्प्रचार शाळेत शिकवला होता. शोबाजी न करण्याचे संस्कार लहानपणापासून झाले होते. तेव्हा लताचं उदाहरण दिलं जायचं. खांद्यावरून घट्ट लपेटलेली साधी साडी, दोन घट्ट वेण्या, चष्मा अश्या वेशात गाणारी लता भक्तीगीत,




शृंगारिक गीत, प्रेमगीत, वीरगीत तितक्याच तटस्थ चेह-याने गात असे. पण तिचा आवाज त्या गाण्यात ज्या भावना निर्माण करायचा ते भाव पडद्यावर दाखवताना अनेकदा नायिकांची त्रेधा तिरपीट उडत असे. आजच्या पोट दाखवत धांगडधिंगा करणाऱ्या मिक्सर गायिका (!?) पाहिल्या की त्यांना ‘कुठल्या गाण्यात लताचा श्वास ऐकू येतो?‘ हे शोधायचा टास्क देऊन तिची गाणी ऐकायला काही वर्षे एखाद्या खोलीत कोंडून ठेवावं असं वाटतं. खोलीतून बाहेर येतील तेव्हा गायिका म्हणून नक्कीच समृद्ध झालेल्या असतील. तुलनेचा सवालच नाही. पण ‘वय झालं आणि गेली‘ असं म्हणत लताला हलक्यात घेणा-या आणि फटकळ गायकांची फॅन असलेल्या माझ्या


10 नभरंग





त्या कलीग सारख्या यो जनरेशन मधील, सात्विक सुग्रास थाळीपेक्षा lays च्या हवेने फुगवलेल्या पाकिटाला मिष्ट ान्न  मानणा-्या बधिर लोकांना लता काय आहे आणि तिच्या जाण्याने काय काय गेलंय हे कधीतरी समजावून सांगायची इच्छा होते!

बाळासाहेब जाताना आमच्या मधील होता नव्हता तेवढा राजकारणातील रस घेऊन गेले. पुल गेले आणि

जाताना आमची वाचनाबद्दल असलेली आसक्ती घेऊन गेले, सचिन निवृत्त होताना वानखेडेच्या खेळपट्टीला नमस्कार करून त्याचं स्पीच देऊन रडला आणि आमचा क्रिकेट मधील खरा इंटरेस्ट संपला. तशीच आज लता जाताना आम्हा भक्तांची संगीतावरची विशेषतः  सिन–ेमा संगीतावरची श्रद्धा बरोबर घेऊन गेली. सध्या

सिनेमा संगीत आणि गायकी म्हणून जे समोर येतंय ते ऐकणं केव्हांच बंद केलं होतं पण प्रभुकुंजच्या देवळात आमची सरस्वती लता तिच्या आवाजातून असंख्य वर्ष अमर राहील. आमच्या ह्मदयाच्या मंदिरात तिची मूर्ती आम्ही जिवंत असेपर्यंत जिवंत राहील. पण आज भारतीय संगीताच्या मांडवतील सरस्वती मांडव रिकामा सोडून गेली आहे. जाताना  देवाने लाखो वर्षात निर्माण केलेला एकमेव दैवी आवाज बरोबर घेऊन गेली आहे. आता ती फक्त आमच्या कानात आणि मनात असणार. प्रभुकुंजच्या देवळातील देवी आज विसर्जित झाली आहे! लता  एकटी गेली नाहीये. ती आमच्या भावविश्वाचा, आमच्या ह्रुदद्दु चा लचका तोडून काळाच्या पडद्याआड गेली आहे. संगीताच्या सुवर्णयुगाची महत्वाची साक्षीदार त्या इतिहासाच्या खुणा पुसून गेली आहे! आजूबाजूला डॉल्बी लावली तरी आमचे कान ह्यापुढे सुन्न असतील. लता आमची गाणी ऐकायची इच्छा घेऊन आम्हाला विरक्तीच्या एक पाऊल जवळ पोहोचवून गेली आहे! लता एकटी गेलेली नाही. आमच्यातील काहीतरी स्वतःबरोबर नेऊन आम्हाला अपूर्ण, विकलांग करून गेली आहे! आज 'सूरास्त' झाला आहे!

मंदार जोग




11 नभरंग





पहाटकाळची कोवळी सुवर्ण किरणं
दवबिंदूमध्ये भिजवून कमलतंतू च्या
लेखणी ने फुलपाखराच्या पंखावर
लिहिलेलं मानपत्र तिला गुलाब कळीच्या
करंडकातून अर्पण करायला हवं ..!
लताचा आवाज हा मानवी सुष्ठीतला
एक अद्भुत चमत्कार आहे..!
साक्षात विधात्याला असा चमत्कार पुन्-
हा घडवता येणार नाही.. श्रीकृष्णाच्या
मुरलीचा साद ,उर्वशीच्या नुपुरांची
रुणझुण आणि सरस्वतीच्या वीणेचा
झंकार हे तिन्ही एकवटून विधात्याने
आपल्या लताचा कंठ घडवला असेल ..
सूर ,लय ,ताल ,सिद्धी आणि प्रसिद्धी
या गोष्टी जिथे एकत्र येतात त्या जागेला
आपण लता मंगेशकर अस म्हणावं...
....कारण संगीतातील सात सूर म्हणजे

फक्त आणि फक्त आपली..... लता







12 नभरंग

# स्वरलता

आदरणीय लतादीदींना
त्रिवार वंदन , मनाचा मुजरा
आणि भावपूर्ण आदरांजली.



लता दीदी निवर्तल्या.सोशल मीडिया ,वर्तमान पत्रे सगळेच लतामय झाले.भारतीयच नाही तर जगभरातील स्वरप्रेमी शोकसिंधूत बुडाले.गायिका,संगीतकार म्हणून त्या श्रेष्ठ आहेतच .त्यांच्या दैवी आवाजाला तोड नाहीच.परंतु मला जे वेगळेपण जाणवले ते वेगळ्याच गोष्टीत .वयाच्या तेराव्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले.चार भावंडे,आई ,एक मावस बहीण अश्या कुटुंबाची जवाबदारी छोट्या लतावर पडली.तेराव्या वर्षीच ती पोक्त झाली.मनात नसतान–ा अभिनय क्षेत्रात उतरावे लागले.पडेल ती,पडेल तसली कामे केली.घरच्यांना दोन वेळचे पोटभर जेवण देणे ह्या एकाच उद्देशाने ती झपाटली होती.१६-१७ वर्षी गायनाची संधी मिळाली आणि तिथून सुरु झाला एका स्वरयात्रीचा प्रवास.न थांबणारा.हे सगळे होत असतानाच तिला अपार प्रसिद्धी मिळाली.नावलौकिक झाला.प्रसिद्धीची हवा भल्या भल्याना आपल्या कवेत घेतल्या वाचून राहत नाही आणि सिनेमाच्या दुनियेत तर सगळे चकचकीत,वलयांकित असते.तिथे मोहात पडायला एक क्षण पुरेसा असतो.परंतु

जिवंत आहे ह्याचा आधार आणि आनंद होता! आज लता जाताना तो आधार, तो आनंद, आमच्या जडणघडणीचा महत्वाचा

या व्रतस्थ स्त्री ने आपल्या भोवती संस्कारांचे रोप इतके मजबूत केले होते कि तिने आपला तोल कधीही ढळू दिला नाही.खांद्यावरचा पदर कधीही ढळला नाही कि लांबसडक केस कधीही मोकळे सुटले नाहीत.मर्यादेचे भान कधीही सोडले नाही.आयुष्यभर मर्यादा जपणा-्या पुरूषाला आपण पुरुषोत्तम राम म्हणतो.तो आपल्यासाठी वंदनीय आहेच. पण मग कलियुगात आपली मर्यादा,आपली आब राखून ठेवणा-या एका व्रतस्थ स्त्रीला आपण लता मंगेशकर म्हणावे असे वाटते.आणि म्हणूनच त्यांच्या प्रति वाटणारा आदर ,विश्वास हा श्रद्धेत परिवर्तित झाल्या शिवाय राहत नाही.

त्यांचा आणखीन एक भावलेला गुण म्हणजे त्यांचं राष्ट प्रेम.वीर सावरकर,भालजी पेंढारकर अश्या राष्ट्रभक्तीने स्फुरलेल्या लोकांचे सानिद्ध्य लता दीदींना लाभले.म्हणूनच ते त्यांच्यातहि भिनत गेलं असावे.पण मूळ अंतरात हे बीज असल्याशिवाय ते रोपटे जीव धरणे कठीण असते.गोवा मुक्तिसंग्रामात सुधीर फडके कार्यरत





13 नभरंग

होते.मुक्तिसंग्रामासाठी निधी संकलन करीत होते.त्यासाठी त्यांनी लतादीदींचा गायनाचा कार्यक्रम आखला होता.लता दीदीनी गायनाची बिदागी घेतली नाही.कार्यक्रमासाठी येताना त्यांना वाटेत अपघात झाला आणि कार्यक्रम त्या दिवशी रद्द झाला.पण दुस-या दिवशी लतादीदी पुण्यात आल्या आणि कार्यक्रम पार पडला.संकलन झालेला निधी मुक्तिसंग्रामासाठी वापरला गेला.गोमंतकन्येने तिचा खारीचा वाटा उचलला होता.

गोमंतक मराठी अकादमीची ‘मराठी भुवन‘ह्या इमारतीचा शिलान्यास लतादीदींनी केला होता.नंतर वस्तू उभी राहिली.स्वर्गीय आवाजाची देणगी लाभलेल्या आणि मराठी भाषेचा जाज्वल्य अभिमान बाळगणा-या ह्या गोमंतकन्येच्या हस्ते हा सोहळा संपन्न झाला.ज्या प्रमाणे लतादीदींच्या स्वर,त्यांचा दैवी आवाजाला अमरत्व प्राप्त आहे त्याचप्रमाणे गोमंतकात मराठी भाषा अमर असेल हा दृढ विश्वास माझ्यासारख्या सामान्य गोमंतकियाच्या मनात तेव्हाच निर्माण झाला होता.

लतादीदींची आपल्या वडिलांच्यावर दृढ श्रद्धा होती. त्यांनी जेवढे सामाजिक उपक्रम राबवलेत ते सगळे आपल्या वडिलांच्या नावे राबवलेत.अनेक हॉस्पिटल्स, अनेक देणग्या ह्याला सीमा नाही.त्यांचा शेवटचा श्वास हि वडिलांचे गाणे हेडफोन वर ऐकता घेतला असे माझ्या वाचनात आले.लतादीदींच्या एका मुलाखतीत

त्यांनी सांगितले होते कि मला पुनर्जन्म नको.आणि पुन्हा जन्म झालाच तर तो लता मंगेशकर म्हणून नको .कारण लोकांना माझ्या भोवतालचे वलय दिसते पण मी किती परिश्रमपूर्वक इथवर आलेय हे मलाच माहित आहे.पण एक गोमंतकन्या म्हणून,एक भारतीय म्हणून मला लतादीदींचा पुनर्जन्म व्हावा असे मनापासून

वाटते .मात्र त्याबरोबर माझाही पुनर्जन्म व्हावा पण त्या जन्मात देवाने मला त्यांचे वडील करावे आणि त्या माझ्या कन्या व्हाव्यात असा मोह मला होतो आणि तो पूर्णत्वास यावा अशी मंगेशा चरणी प्रार्थना .



# लता मंगेशकर

सा रे ग म प ध नी आपल्या सर्वांच्या लाडक्या लतादीदींना

देश - विदेशातील आबालवृद्धांच्या लाडक्या भारतरत्न, गानकोकिळा, देवी सरस्वतीची या पृथ्वीतलावरील प्रिय सुपुत्री लतादीदी आता आपल्यात नाहीत. त्या आपल्याला सोडून स्वर्गाच्या तारका समुहात जाऊन बसल्या आहेत. त्यांचे पृथ्वीवरचे (पंचतत्वात विलीन झाल्यावर) दर्शन आता होणे नाही. अमृतानंद देणा-या आवाजाच्या शिदोरीचा अमुल्य ठेवा त्या आपणासाठी ठेऊन गेल्या आहेत. हजारो गाण्याच्या या शिदोरीतील प्रत्येक गाणे ऐकतांना त्यांची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. कुठल्याही झाडाच्या फांदीवर कोकिळा गातांना दिसली किंवा तान जरी ऐकु आली तरी रसिकांच्या ह्रदयात लता दीदींच्या गाण्यांची तार कळत नकळत छेडली जाईल. माझी पीढी खरोखरच भाग्यवान आहे. कारण याची देही याची डोळा लता दीदी आम्हाला पहायला, ऐकायला मिळाली. तिच्या तलम, मुलायम व स्वर्गीय आवाजाने आमच्या कानांचे पारणे फिटले. असा कलावंत जन्माला यायला शतकानुशतकं वाट पहावी लागते. आम्ही देवाचे ऋणी आहोत की त्याने आम्हाला अशा शतकात जन्माला घातले. अशा समृध्द शतकाचे साक्षीदार होण्याचे भाग्य आम्हास लाभले. दीदींच्या जाण्याने भारतीय अभिजात संगीतातील जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधी भरून येऊच शकणार नाही. आपल्या स्वर्गीय आवाजाने संगीतविश्वात अनेक दशके राज्य करणा-या आणि लाखो नव्हे तर

कोटी कोटी जनमान-

ासांच्या ह्रदयसिंहासनावर आवाजाच्या माध्यमातून कायमच्या विराजमान असलेल्या लतादिदींचे इहलोक सोडून जाण्याने शोकाकुल ह्रदयांची भग्नावस्था झाली आहे. कुठेही मुलाखत देताना त्यांनी कान्हदेशाशी (खान्देशशी) असलेला ऋणानुबंध आणि आठवणींचा ठेवा नेहमीच मांडला होता. त्यांच्या जाण्याने भारतीय अभिजात संगीतातील एक दैवी देणगी आज काळाच्या पडद्याआड गेली आहे.

भावपूर्ण श्रध्दांजली





15 नभरंग





16 नभरंग

# पं. ह्मदयनाथ मंगेशकर यांनी सांगितलेली आठवण -



त्या दिवशी आम्ही सर्व रेकॉर्डिंग करण्यासाठी ए.एम.व्ही मध्ये जमलो होतो. रेकॉर्डिंग होते ज्ञानेश्वरीचे ‘ ॐ नमोजी आद्या‘ या ज्ञानेश्वरांच्या पहिल्या ओवीपासून ध्वनिमुद्रणाचा प्रारंभ होणार होता.

सर्व वादक जमले होते, तालमी चालू होत्या पण मनासारखे काही जमत नव्हते. कुठे ना कुठेतरी खटकत होते. मन स्वस्थ नव्हते.

दीदी आली. अगदी वेळेवर आली. वेळेचं महत्व ती जाणते. त्यामुळे इतके नाव होऊनही दीदीमुळे ध्वनिमुद्रण कधीही खोळंबत नाही.

नेहमीच्या पद्धतीप्रमाणे तिने कागद पेन घेतलं आणि ज्ञानेशांच्या पहिल्या ओव्या ती कागदावर उमटवू लागली, तिची एक सवय आहे. दुर्सयाने लिहिलेला गाण्याचा कागद घेऊन ती कधीही माईकसमोर उभी रहात नाही. आधी स्वतः गाणे लिहील, नंतरच माईकपुढे उभी राहील. गाणे उतरवून घेत असताना ती गुणगुणत रिहर्सल करते.

थोड्यावेळाने आम्ही कसेबसे वृंद वादन जमविले व दीदी माईक  उभी राहिली. मी ध्वनिमुद्रकाच्या खोलीत गेलो, छानपैकी दोन तंबोरे सुरात मिळाले होते. दोघांचे सूर एकमेकात मिसळत होते. तेवढ्यात तिसरा सूर त्यात मिसळला. ॐ नमोजी आद्या, वेद प्रतिपाद्या ‘ मनाची अस्वस्थता पार पळाली. ते एका नव्याच जाणीवेने भरून आले. आपण या शब्दांना फार छान सूर दिलेत असे वाटूना लागले .तोच दूसरा विचार मनात आला, अरे दहा मिनिटांपूर्वी काही जमत नाही म्हणून मन खट्टू झालं होत, तोच हा अहंकार !



अरे ही तुझ्या संगीतनियोजनाची नाही, तर तिच्या स्वराची किमया आहे.

गुरूचे स्मरण करून कानाला हात लावला.सगळ्यांचे चेहरे भारावले होते. ज्ञानेशांची वाणी एका समर्थ, सुरेख गळ्यातून प्रसवत होती दोन तंबोयात जणू तिसरा तंबोरा मिसळला होता. तंबोयाच्या खर्जातून  उठणारा गांधार दीदीच्या गळ्यातून उमटर्णाया गांधारात लोप पावत होता.

या गांधारावरून आठवण झाली, ‘ लताबाईंच्या गळ्यात गांधार आहे म्हणून त्यांचे इतके नाव झाले वगैरे वगैरे’. असे वारंवार ऐकावयास मिळते, वाचावयास मिळते. चांगले चांगले संगीतकारही ही गोष्ट बोलताना मी ऐकले आहे. गळा गोड आहे, सुरेल आहे .सूर तीक्ष्ण आहे.खर्ज तयार आहे. हे सर्व शब्दप्रयोग मला मान्य आहेत.ते रूढही आहेत. पण गळ्यात गांधार याचा अर्थ काही माझ्या लक्षात आली नाही.

गळ्यात गांधार आहे, मग बाकीच्या सहा सुरांचे काय ? बरे, माझे वडीलच दीदीला म्हणाले होते , ‘लता गळ्यातला गांधार जप हो . ‘ मला बरेच दिवस हे कोड होते. ही गांधाराची काय भानगड आहे?

पण अचानक एक दिवशी हे कोडे उलगडले. मी तंबोरा सुरात मिळवत बसलो होतो. रात्रीचे अकरा वाजले होते .मुंबई त्या रात्री तरी शांत होती. मी अगदी सहज गंमत म्हणून तंबोरा मिळवित बसलो होतो. पण तंबोरा सुरातच मिळेना. कधी जोड सुरात मिळे. तर कधी पंचम सुरातून सुटायचा. कधी पंचम, जोड सुरात लागली , तर खर्ज सुरातून निसटायचा.  कितीतरी वेळ मी प्रयत्न करीत होतो. सहज घड्याळ्यात बघितले. रात्रीचे अडीच वाजले होते. अरे बापरे , मी साडेतीन चार तास प्रयत्न करीत होतो. पण तंबोरा अजून बद्‌सूरच वाजत होता . मीही हट्टाला पेटलो . सँडपेपर घेतला . जव्हारी घासली परत सर्व तारा मिळविल्या . जव्हारीत नवीन धागा अडकविला आणि तंबोरा सुरात मिळवू लागलो, आणि अचानक भास झाला की तंबोरा जरा सुरात बोलतोय , परत प्रयत्न केला आणि थोड्या वेळाने तंबोरा छान बोलू लागला . खर्जाच्या तारेतून स्वच्छ गंधार ऐकू येऊ लागला .

आणि थोड्या वेळात षड्ज लुप्त होऊन खोली नुसती गंधाराने भरून गेली. ज्यावेळी तंबोरा चांगल्यापैकी सुरात मिळतो, त्यावेळी खर्जाच्या तारेतून गांधार उमटतो. हाच ’ सही गांधार’ मला पट्‌कन बाबांचे शब्द आठवले, ‘ लता गळ्यातला गांधार सांभाळ . ‘ याचा अर्थ एवढाच की , ‘ सही षड्‌जा ‘ मधून गांधार उमटतो असे सर्व ‘ सही सूर ‘ लागू दे की षड्‌जामधून गंधार , पंचमातून रिखब असे हे सर्व ‘ सही सूर ‘ एकत्र होऊ देत.

सकाळी मी दीदीला विचारलं , दीदी , गंधाराची काय भानगड आहे ? बाबा तुला काय म्हणाले होते ? दीदी हसून म्हणाली , ‘ गळ्यातला गांधार’ या शब्दाचा अर्थ लोकांना कळलाच नाही. अरे बाबा , रियाजाला बसले की मी त्यांच्या शेजारी बसायची. अचानक बाबा म्हणायचे , लता गांधार जप . ‘ मी पट्दिशी गांधार लावायचे. बाबा म्हणायचे , वा ! हा सही गांधार अगदी खर्जातून आल्यासारखा . ‘

माझे शंकानिरसन झाले. गांधार हा षड्‌जाचा पडसाद . ज्याचा गांधार तंबोरीत मिसळतो. त्याचा षड्‌ज सही लागलाच पाहिजे व ज्याचा षड्‌ज सही त्याचे सप्तस्वरही ‘ सही ‘. बाबांना दीदीच्या सुरेलपणाबद्दल आत्मविश्वास होता.म्हणून ते शेवटी म्हणाले की , लता गळ्यातला गांधार जप हो . ‘ हा गांधार , हा सुरेलपणा टिकविण्यासाठी दीदीने खूप परिश्रम घेतले. चांगल्या चांगल्या गवयांकडून गाण्याचे शिक्षण घेतले.

तासन्‌ तास सुरेल गवयांचे गाणे ऐकले. नॅट किंग कोल , सुबुलक्ष्मी , सैगल , पैस्ली , उ. अमीरखाँ , बडे गुलाम




18 नभरंग

अली , नूरजहाँ , अब्दुल वहाब यासारख्यांच्या रेकॉर्डस् तासन् तास घासल्या. तेव्हा कुठे हा गंधार टिकला , फुलला. त्याच्या सुगंधाने साया विश्वाला मोहित केले. आणि अजूनही विश्व झुलवित आहे.

अडीच तपे एका जागेवर राहणे असाध्य आहे. दीदीने हे असाध्य काम अत्यंत सोपे करून दाखविले आहे.

एका अत्यंत उंच अशा ठिकाणी ती उभी आहे. आजूबाजूला खोल खोल दया आहेत. भोवताली स्थितप्रज्ञाप्रमाणे पहाड उभे ठाकले आहेत. दीदी कला आणि प्रसिद्धी याचा तोल सांभाळीत गेली ६०र्षे उभी आहे.

१९४२ साली दीदी पहिलं गीत गायली . त्याला आज पाच तप उलटून गेली . ते अजूनपर्यंत ती गातच आहे, गातेच , गातच राहणार. कारण ' कलेसाठी कला ' हे तिचं जीवनतत्व . १९६७सालच्या एप्रिल महिन्यात तिच्या कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाली . म्हणून आम्ही काही मंडळी तिच्या कलाजीवनाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त कार्यक्रम आखीत बसलो होतो. तेवढ्यात दीदी आली. मी तिला म्हणालो , ' तुला चित्रजगतात प्रवेश करून २५वर्षे पूर्ण होत आहेत , म्हणून आम्ही कार्यक्रम सादर करणार आहोत , तुझा सत्कार करणार आहोत . पण या सिल्व्हर ज्युबिलीबद्दल तू काय देणार ? ज्या रसिकांनी आज २५वर्षे अखंड तुझे कौतुक केले , त्यांच्यासाठी तू काय करणार ?' दीदीनं थोडा वेळ विचार केला , मग तिला अचानक काही सुचले व म्हणाली , ' मी गाण्याशिवाय काय देणार ? माझ्या महाराष्ट्रासाठी गाईन , माझ्या भारतासाठी भगवद् गीता ! बाळ , या दोन लाँग प्लेइंग ध्वनिमुद्रिका काढायच्या. 'मी बुचकळ्यात पडून म्हणालो , ' दीदी ज्ञानेश्वरी एवढी प्रचंड , ती रेकॉर्डमधे कशी बसणार ? तसेच गीतेमधला कुठला भाग घेणार ? गीतेमधले सगळेच योग उत्तम . मग कुठला घेणार , नी कुठला गाळणार ? ' पट्कन ती म्हणाली , ' अरे ज्ञानेश्वरीचे ' पसायदान' घ्यायचे आणि गीतेमधला ' पुरुषोत्तम योग ' आम्ही लगेच कामाला लागलो . दीदी गात होती.

' ओम् नमोजी आद्या ' गांधारात गांधार मिसळत होता . सर्व वातावरण पवित्र झाले होते . मंदिराच्या गाभायात मंत्र घुमतात तसे सूर घुमत होते . ' ओम नमोजी आद्या .... ओम नमोजी आद्या . '












19 नभरंग



स्वरसम ज्ञी लता मंगेशकर, एक आभाळभर व्यापून असलेलं स्वरमय व्यक्तिमत्व !!!जवळजवळ एक शतक व्यापून असलेला त्यांचा संगीतमय प्रवास म्हणजे संगीत इतिहासातील मानाचं पान !!!

लतादीदी ना प्रत्यक्ष भेटण्याची दोन वेळा संधी मला मिळाली.. एकदा लोकसत्ता चतुरंग पुरवणी साठी 'आम्ही दोघी बहिणी ' हे पाक्षिक सदर मी लिहीत होते तेव्हा आणि दुसरे म्हणजे ' पी सावळाराम गौरव ग्रंथासाठी' त्यांनी गायलेल्या पी सावळाराम यांच्या गीताबद्दल लिहायचे होते ..त्यासाठी त्यांची मुलाखत घ्यायची होती तेव्हा.. सात्विक, शालीन , लतादीदींचे व्यक्तिमत्व प्रत्यक्ष पाहताना आणि ऐकताना, समजून घेताना मलाच मी स्वप्नात तर नाही ना असं वाटत होतं.. त्यांची ती प्लेन काठापदराची साडी ,लांब केसाच्या छान अगदी शेवटपर्यंत गुंफलेल्या त्या दोन वेण्या आणि मला असं वाटतं की मी स्वप्नात तर नाही ना !!अगदी !साक्षात शारदा, सरस्वतीचा सहवास मी अनुभवला.. अत्यंत भारावलेले होते मी तेव्हाचा तो अनुभव मी त्या त्या लेखात नोंदवला आहे. आज लतादीदीना 'भावपूर्ण श्रद्धांजली 'व्यक्त करताना हे सारे मला पुन्हा पुन्हा आठवतेय त्यांची मूर्ती माझ्या डोळ्यासमोर येत आहे. अवघ्या विश्वाला आपल्या गाण्याच्या मोहिन–ीने भारावून टाकणारी गानसरस्वती लतादीदी.. यांची गिनिज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मधे नोंद झाली आहे.त्यांचा स्वर चिरायू आहे.आज प्रत्यक्षात त्या आपल्यात नाहीत.. गीतांच्या माध्यमातून त्या अमर आहेत. प्रत्येकाच्या मनात वास करत आहे...त्याना

....

डॉ.रजनी अपसिंगेकर. पुणे





20 नभरंग

धुळे जिल्ह्याने अभिनानाने सांगाव्या अशा काही गोष्टींचा ठेवा धुळे जिल्हावासियांकडे आहे . त्यापैकी सर्वात मोठा आठवणींचा ठेवा आहे, गानकोकिळा, भारतरत्न, संपूर्ण देशाचा अलौकिक ठेवा स्व. लता दीदी मंगेशकर यांचे धुळे जिल्ह्यातले बालपण ! स्व. लता दीदींना कालच संपूर्ण देशाने अखेरचा निरोप दिला. त्यावेळी धुळेकर व संपूर्ण खान्देशवासियांची आपल्याच परिवारातील एक मोठा ठेवा हरपल्याची भावना होती. स्व. लता दिदींचे आईकडचे

## धुळे जिल्ह्याच्या मातीत बागडलेल्या गान समाज्ञी -स्व. लता दिदी!

आजोळ धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील थाळनेर येथील होते. आजी मुळच्या इंदोरच्या गायकी वाल्या होत्या . थाळनेरच्या लाड ( शिंपी ) यांच्याशी त्यांचे विवाह संबंध जुळले. त्या थाळनेरला येवून राहिल्या. त्यापासून त्यांना लता दिदींच्या आई ( माई मंगेशकर ) हे अपत्य झाले. मंगेशीचे मास्टर दिनानाथ हे नाटक कंपनी सोबत गावोगाव फिरत

. मास्टर दिनानाथ हे शास्त्रीय संगित करीत असत . खास करून स्त्री पात्रही करीत असत. त्यामुळे त्यांना विवाह समस्या होती. थाळनेरच्या लाड यांचे लांबच्या नात्यातले भाउ धुळ्यात सर्व्हिस गाड्यांचा व्यवसाय करीत असत. त्यांनी मास्टर दिनानाथांना शेवंता लाड उर्फ माई मंगेशकर यांचे स्थळ सुचविले व हा संबंध झाला. या प्रकारे अभिनय व गायकी दोन्ही बाजुंनी लता दिदींना मिळाली. अहिराणी व इतर गाणी लता दिदींच्या आई व आजींच्या ओठांवर सतत असावयाची. थाळनेर हे तापीकाठचे गाव. एकेकाळी फारुकी राजांच्या काळात खान्देशच्या राजधानीचे हे ऐतिहासिक गाव. लता दिदीचे



वडील मास्टर दीनानाथ . त्यांची गावोगावी फिरणारी नाट्य कंपनी होती. लता दिदींच्या आजी थाळनेरच्या होत्या . त्यांची मुलगी थाळनेरच्या शेवंताबाई उर्फ माई मंगेशकर यांच्याशी मास्टर दीनानाथ यांचा विवाह झालेला. लता , आशा, उषा, . मीना या चार बहिणी व हृदयनाथ मंगेशकर हे एक भाऊ . अशी पाच भावंड . लता दिदींचा जन्म इंदोरला दि . २८। ०९ । १९२७ रोजी झाला . लता दिदींचे बालपण मात्र थाळनेरला गेले. थाळनेरच्या जिल्हा परिषद मराठी शाळेत त्यांचे नाव १ जून १९३२ रोजी टाकण्यात आले . १९३७ पर्यंत पाचवी - सहावी पर्यंत त्यांनी थाळनेरला शिक्षण घेतले . लता दिदी १३वर्षांच्या होत्या तेव्हा त्यांचे वडील वारले. इतक्या कमी वयात त्यांच्यावर परिवाराची जबाबदारी आली. प्रारंभी त्यांनी कोल्हापूरला मास्टर विनायक यांच्या कडे चित्रपटात कामे केली . तेव्हा नुरजहाँ यांनी लता दीदींच्या आवाजातली जादू ओळखली .

त्यानंतर लता दिदींनी मुंबई गाठली . प्रारंभी अभिनय व गाणे सुरु होते. मात्र त्यानंतर लता दिदीं– नी गाणे हेच आपले जिवित कार्य मानले. त्यानंतरचा त्यांच्या दैवी कर्तुत्वाचा प्रचंड इतिहास जगासमोर आहे. लता दिदींना इतके सर्वोच्च पुरस्कार मिळाले, की त्याची गणना नाही . नंतर लता दिदींच्या नावामुळे ते पुरस्कारच सन्मानित व्हावेत अशी स्थिती झाली. स्व . पु . ल . देशपांडेंनी खूप चांगल्या शब्दात वर्णन केले


21 नभरंग

होते . ' आकाशात देव आहे की नाही , मला माहित नाही . पण आकाशात चंद्र , सुर्य आणि लता दिदींचा स्वर कायम स्वरुपी आहे . प्रत्येक क्षणास लता दिदीचा आवाज कुठून तरी कुठे जातच असतो . ' जवळपास ७५ ते ८० वर्षे लता दिदी आपल्या स्वर्गिय स्वरात गात होत्या. पन्नास हजारावर गिते त्यांनी गायली. एकेका दिवसात सहा सहा गितेही गायली . या स्वर्गिय सुरांमुळे लतादिदी अजरामर आहेत. त्यांचे मेरे वतन के लोगो . . . हे गित ऐकताच डोळ्यात पाणी आले नसेल असा भारतवासीय विरळाच असेल. विशेष म्हणजे फारशी रिहलर्सला वेळ न मिळाल्याने लता दिदींनी हे गीत उत्स्फूर्तच गायले होते. तेव्हा पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचेही डोळे पाणावले होते. प्रत्येक भारतीयांच्या वेगवेगळ्या भाव भावनांना केव्हातरी स्पर्श करणारे गीत लता दिदींचेच राहिले आहे. मा. बाळासाहेब ठाकरे, ना. नरेंद्र मोदींपासून देशातल्या कितीतरी सर्वोच्च व्यक्तिमत्त्वांनी स्व. लता दिदीं बाबत वेळोवेळी सन्मान व्यक्त केला आहे. हे उत्तुंगाहूनही उत्तुंग असे व्यक्तिमत्व धुळे जिल्ह्याच्या मातीत खेळले बागडले आहे . त्याचा धुळे जिल्हावासियांना अभिमान आहे. लता दिदी ज्या घरात बालपणी राहिल्या बागडल्या ते घर थाळनेरमध्ये आजही आहे . जुने कडी पाटाचे ते घर आहे . प्राथामिक शिक्षक पंढरीनाथ कोळी यांचा परिवार या घरात राहिला . या घरासमोर माई मंगेशकरांनी एकत्रित निंब व पिंपळाचे झाड लावले होते. ते आजही आहे . लता दिदींनी आपल्या आई माई मंगेशकर यांच्या इच्छे नुसार थाळनेरला एक चांगले खंडेराव मंदिर १९६७ मध्ये बांधले होते . त्यावर कोनशिला आहे . ' कै . हरीदास रामदास लाड यांच्या पुण्यस्मरण प्रित्यर्थ यांच्या कन्या श्रीमती माई मंगेशकर यांनी श्री खंडेराव म.चे मंदिर मिती मार्गशीर्ष वद्ध १९६७ रोजी बांधविले .' लता दिदींचे भाउ ह्मदयनाथ मंगेशकर १९९०मध्ये धुळ्यास आले होते . तेव्हा गरुड मैदानात त्यांचा कार्यक्रम झाला होता. तेव्हा व जळगावला आले तेव्हा त्यांनी थाळनेरला भेट दिली होती. १९९५-९६ ची ही घटना आहे. मंगेशकर परिवाराची थाळनेरला १८ एकर शेतीही होती असे सांगितले जाते. थाळनेरच्या जमादार परिवाराशी दीदींचे चांगले संबंध होते . दोंडाइच्याचे दादासाहेब राउळ यांची मुलगी ताईसाहेब जमादार या परिवारात सून होती. त्यांच्या सार्सयांवर लता दिदींनी एक गाणेही म्हटले होते, असे सांगितले जाते. थाळनेरच्या काही मंडळीनी थाळनेरला संगित विद्यालय काढावे यासाठी लता दिदींकडे पाठपुरावा केला होता . पण ही इच्छा पूर्ण झाली नाही. लता दिदी उभ्या आयुष्यात नंतर कधिही थाळनेरला आल्या नाहित. या मागे वेगवेगळी कारणे असू शकतात. लता दिदीं प्रमाणेच स्व . स्मीता पाटील यांनी धुळे जिल्हा व शिरपूर तालुक्याचे नाव देशात मोठे केले आहे. जेव्हा जेव्हा चित्रपट सृष्टीचा इतिहास चर्चिला जातो. तेथील गीत, संगित, नृत्य, अभिनय या क्षेत्रात धुळे जिल्ह्याचा संबंध असणारी अनेक उत्तुंग नावे घेतली जातात. त्या सर्वांच्या वर उत्तुंगाहून उत्तुंग नाव स्व . लता दिदींचे घेतले जाते. त्यांच्या स्मृतीस विनम्र मानवंदना !

— दीपावली पाटील




22

# साक्षात्कार

वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळ्या पद्धतीने होतो .परंतु सरस्वतीचा साक्षात्कार सर्वांनाच एकाच रुपात या भुतलावरती व्हावा हे आपले आहोभाग्य म्हणावे लागेल . होय भूतलावरची साक्षात सरस्वती म्हणजे स्वर सम्राज्ञी, गानकोकिळा लता मंगेशकर .

२८ सप्टेंबर १९२९ रोजी प्रसिद्ध रंगमंच कलाकार मास्टर दीनानाथ मंगेशकर आणि शेवंती (माई ) मंगेशकर यांच्या पोटी लता हे पहिले अपत्य इंदोर मध्ये जन्माला आले .वयाच्या पाचव्या वर्षा पासूनच लता दिदींने गायनाला सुरवात केली . सातव्या वर्षी एका नाटकासाठी आणि नवव्या वर्षी किती हसाल या मराठी चित्रपटासाठी त्यांनी सर्वप्रथम बालगीतासाठी पार्श्वगायन केले. वडीलांचे अकाली निधन आणि त्यामुळे आईला बसलेला मानसिक धक्का व त्यांचे आजारपण यामुळे वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी लता दीदींवर घराची संपूर्ण जबाबदारी येऊन पडली . कुटुंबाची काळजी घेण्यासाठी , उदरनिर्वाहासाठी त्यांना सुरवातीला चित्रपटात काम करावे लागले. पण त्यांचे मन काही त्यात रमले नाही . त्याच बरोबर त्यांचे पार्श्वगायन ही सुरूच होते. पण सुरवातीच्या काळात बरेच अपमान त्यांना सहन करावे लागले. जोडीला कठोर परिश्रम . सर्व लहान भावंडांची जबाबदारी स्वीकारली. लहानाचे मोठे केले सर्वांना . या सर्व लहान भावंडात ही वडिलांच्या सुरांचा वारसा कमी अधिक प्रमाणात उतरलेला . वडील आणि परमेश्वरा वर असलेली गाढ श्रद्धा यामुळे मंगेशकर परिवाराने सर्व संकटांना धैर्याने , एकजुटीने तोंड दिले .

लता दिदींबद्दल बोलायचे म्हंटले तर आज शब्द ही तोकडे पडताहेत .

गेल्या आठ -दहा दशकाहून अधिक काळ जगभरातील अगणित संगीत प्रेमींच भावविश्व समृद्ध करणारा दैवी स्वर म्हणजे लता मंगेशकर.

सर्व भाषा ,जात-पात , धर्म , प्रांत आणि देश अशी सर्व बंधने तोडून , सर्वांना एकत्रित जोडून ठेवणारा दुवा म्हणजे लतादीदी. हे भारतरत्न आपल्या महाराष्ट्राचं भूषण , खान्देशी वैभव म्हणजे लतादीदी .भारताचे नांव सांगीतिक क्षेत्रात जगाच्या काना कोप-्यात पोहोचवण्याचे महान कार्य लतादीदींने केले . त्या आपल्या सुरेल आवाजाच्या जादूने रसिक श्रोत्यांचे मन भारावून टाकत असत . प्रत्येक गाणे तितकेच सुरेल आणि श्रवणीय .

मला जर कोणी विचारले की , ‘लताजींचं तुझ्या आवडीचं एखादं गाणं सांग.‘ तर मी सांगू शकणार नाही , माझ्या मनाचा खूप गोंधळ उडेल .एक गाणे, कसे शक्य आहे ते! पहा ना , एखाद्या खजिन्याचे दार उघडल्या नंतर हिरे, माणिक ,मोती सोन्याच्या राशीतून काय निवडावे असा गोंधळ उडावा इतकी समृध्द लतादीदींची कारकीर्द!

मराठीत तर भक्तीगीत , भावगीत , नाट्यगीत ,ओव्या , आरती , भूपाळी गझल सा-्यांचाच समावेश आहे ५२००० गाण्यांना आपला सुमधुर आवाज देऊन जागतिक विक्रम करीत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये लतादीदींची नांव नोंदवले गेले .हिंदी मराठी सहित ३६ भाषांमधून त्यांनी गाणी गायिले आहेत .शतक बदलली , पिढ्या बदलल्या , रुपेरी पडद्यावरच्या नायिका बदलल्या पण आवाज मात्र एकच राहिला तो म्हणजे लता मंगेशकरचा .असं म्हणतात ना की मध कितीही जुना झाला तरी त्याच्यातील गोडवा तसाच राहतो . लतादीदींच्या आवाजाला हे समीकरण तितकेच लागू पडते . ही खरोखरच एक दैवी देणगीच आहे .लतादीदी म्हणजे एक दैवी चमत्कारच म्हणावा लागेल . अगदी अलीकडे म्हणजे २०१९ मध्ये पुलवामाची घटना घडली त्यावेळेस पी.एम.नरेंद्र मोदी यांचे ,‘सौगंध मुझे इस मिट्टीकी , मै देश नही झुकने दुंगा ! हे गाणं सुद्धा त्यांनी पहिल्या इतक्याच सुमधुर आवाजात म्हटले आहे .असे म्हटले जाते की त्यांच्या आवाजात द्राक्षाची नशा आहे आणि रुद्राक्षाची भक्ती पण आहे .




23 नभरंग



धर्माची भावना आहे आणि देश प्रेमाची शक्ती पण आहे . म्हणूनच त्या विराजमान असलेली जागा कोणीच घेऊ शकणार नाही .दुसरी लता मंगेशकर न होणे !

आपल्या सुमधुर स्वरांनी संपूर्ण जगावर अधिराज्य गाजविणा-या गान कोकिळेने ६ फेब्रुवारी २०२२ ला या जगाचा निरोप घेतला ही दुःखद बातमी ऐकली/वाचली आणि काळजाचा ठोकाच चुकला . म्हणजेच लईत धडधाडणा-या माझ्या ह्रदयाचा ताल सुद्धा क्षणभर बेताल झाला . काहीच सुचेनासे झाले . आपोआपच लतादीदींचे ते गाणे ..तुम मुझे युं भुलना पाओगे , जब कभी भी सुनोगे गीत मेरे , संग संग तुम भी गुनगुनाओगे ! मनात रूंजी घालू लागले . लतादीदींची आठवण सदैव सर्वांच्याच मनात राहणार आहे .येणा-या अनेक पिढ्या या गान सम्राज्ञी समोर नतमस्तक होत राहतील यात शंकाच नाही . नक्षत्राचे हे देणे दिगंताच्या प्रवासाला निघून गेले त्यामुळे संगीत , सांस्कृतिक विश्वावर शोककळा पसरली .संगीत विश्वाची ही अपरिमित हानी झाली . तरीही त्यांचे ते गाणे , रहे ना रहे हम , मेहका करेंगे ,बनके कली बनके सबा ,बाग ए वाफा में! हे गाणे आठवले की त्या आजही आपल्या सोबतच आहेत असेच वाटते .

लतादीदी लौकिक अर्थाने आपल्यातून निघून गेल्या असल्या तरी कालजयी सुरांच्या रूपाने त्या चिरंतन राहतील .

नाम गुम जायेगा , चेहरा ये बदल जायेगा , मेरी आवाज ही पहचान है .... हे गाणे सतत कानात घुमत राहते आहे .

पृथ्वीच्या गान सरस्वतीने भूतलावरून स्वर्गात प्रस्थान केले . जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला असे आपण ऐकत आलो आहोत . त्यामुळे स्वतः माता सरस्वती या भूलोकावरील सरस्वतीला , एका

पवित्र , पुण्यवान आत्म्याला घेऊन स्वर्गाकडे निघाली . स्वर्गाचे दार ही अभिमानाने उघडले गेले .तेहत्तीस कोटी देवी-देवतांनी ही तिचे आनंदाने , उत्साहाने स्वागत केले असणार .स्वर्ग दोन बोटं उरणे काय असते हे स्वर्गालाही समजले असणार . लता दिदींचे आगमन होताच आख्खा स्वर्ग सप्तसुरात नाहून निघाला असणार . ढोल ताशा , झान्ज , सनई चौघडा तुतारी वाजवून अप्सरा रंभा , उर्वशी , तिलोत्तमा यांनी नृत्य-गायन करून त्यांचे जोरदार स्वागत केले असणार . भू लोकावारील आपली कर्तव्ये आणि जबाबदा-या पार पाडून स्वर्गात जाताना हा जीव म्हणाला असेल ...आता विसाव्याचे क्षण माझे

सोनियाचे मणी,

सुखे ओवीत ओवीत त्यांची ओढीतो स्मरणी.

स्वर्गात लता दिदींनी आपल्या आई-वडिलांचे चरण स्पर्श करून त्या द्वयांना कडकडून घट्ट मिठी मारली असणार . भूलोकावर भावंडांची आई आणि सर्वांच्या लाडकया लतादीदी त्यांच्या आईच्या कुशीत शांत विसावल्या असणार .......

आदरणीय लतादीदींना त्रिवार वंदन , मनाचा मुजरा आणि भावपूर्ण आदरांजली.

रश्मी काळे

अहमदनगर.





24 नभरंग




Latadidi helped Swami Ramanand Tirth,-by performing her concert at Hyderabad ,for fund- raising for construction of Nanded Education Society's People's College ,at Nanded. Amount collected for tickets was handed over for the construction work. Honorarium amount also she donated to the society ,due to which she was given the membership of the society. My father,Bethuji Guruji ,who was founder member and vice-president of NES told me this history, I remember, when I have seen her name in the list of members of NES ,and asked him about it.






25 नभरंग

# मला जरा सूर देता का ?

हा प्रश्न साक्षात जर लता मंगेशकर यांनी एखाद्या तरुण पेटी वादक संगीतकारास विचारले तर काय अवस्था होईल ? त्यांना झोप लागणार नाही, व आकाश दोन बोटे उरेल हो की नाही ? अशीच अवस्था झाली हो औरंगाबाद च्या तरुण संगीतकार केदार देशमुख ची ...

एका कार्यक्रमासाठी तरुण कलाकारांची निवड चाचणी सुरु होती ,सहज म्हणून केदार देशमुख यांनी ती चाचणी दिली आणि ती चाचणी घेत होते लता दीदी यांचे संगीत संयोजक अनिल मोहिले .

अनिल मोहिले च खूप मोठे व्यक्तीमत्व होते ते चाचणी घेत आहेत बघितल्यावर अर्धे तरुण तर मागच्या मागे च परत फिरले.

तेंव्हा केदार देशमुख यांनी त्या ही परिस्थितीत ती चाचणी दिली व ते औरंगाबाद ला निघून आले. व विसरून ही गेले.

एक दिवस घरच्या फोन वर त्यांना अनिल जी चा फोन आला व मुंबई येथे सरावासाठी बोलावले.

मुंबई येथे रोज १५ दिवस कार्यक्रमाचा सराव झाला तेंव्हा त्यांनी सांगितले की दीदी वयाच्या ८५ व्या वर्षी सुद्धा रोज सरावासाठी उपस्थित रहात .आज काल गायक व गायिका माझे गाणे कधी आहे कोणते आहे ते बघून अर्धा ते एक तास देतात व लगेच दुसरी कडे निघून जातात. पण दीदी दुपारी १२ पासून ते सराव संपे पर्यंत म्हणजे ८ वाजेपर्यंत बसून रहात सरावात भाग घेत व फक्त आपलेच नाही तर इतरांचे सुद्धा गाणे कसे होते ते लक्ष पूर्वक एकत व सूचना करत व सूचना ही त्या एवढ्या नम्र पणे करत की समोरचा व्यक्ती भाराऊन जात असे.

एवढे नाही तर वाद्य वाजवणारा मागे कोप-यात जरी असेल तरी तो जर चुकीचे वाजवत असेल तरी दीदी च्या बरोबर लक्षत येत असे व त्याला बरोबर मार्गदर्शन करत.

केदार देशमुख सांगतात की त्यांच्या साठी ते मंतरलेले दिवस होते ते. त्यांच्या फक्त येण्याने सारे वातावरण भारावून जात होते व एक प्रकारचे चैतन्य जाणवत असे .

कार्यक्रम झाल्यावर ही न थकता त्या प्रत्येकाला सही व फोटो काढून देत कुठे ही कंटाळा नाही की तिरस्कार नाही.

त्या कार्यक्रमाला बाबा साहेब पुरंदरे व बाबासाहेब ठाकरे ही उपस्थित होते .

तेंव्हा कार्यक्रमाच्या आधी अनिल जी कार्यक्रमाची तयरी बघण्यासाठी गेले होते. आणी केदार देशमुख हार्मोनियम घेऊन सज्ज झाले होते आणि ते सूर बघत होते अचानक

**औरंगाबाद येथील तरुण संगीतकार केदार देशमुख यांना लता दीदी सोबत हार्मोनियम वाजवण्याची संधी मिळाली तो अनुभव त्यांनी संपादक श्रीपाद पदे सोबत मांडला तोच अनुभव आपल्या वाचकासाठी**



लता दीदी सोबत केदार देशमुख

दीदी चे स्वर त्यांच्या कानी पडले ' जरा सूर देता का ? '

केदार देशमुख त्यांच्या आवाजाने भानावर आले सुर दिला व त्यांच्या जन्माचे सार्थक झाले असे त्यांना वाटते .

आज ही घटना सांगताना त्यांच्या अंगावर रोमांच उभे रहातात व ते त्या आठवणीत रमून जातात .




26 नभरंग

## स्वरलता

वसंत पंचमीस पूजिली शारदा
षष्ठीला ती सोडूनि गेली
गान सरस्वती पृथ्वीवरली
आम्हा पोरके करूनि गेली.

व्रतस्थ जीवन ,सुस्वर कंठ तो
गर्वाचा लवलेश नसे
समाजापरी कर्तव्य निष्ठा
अंतरी तया देवत्व  वसे

कोहिनूर हा भारताचा
गमन करीतसे कैलासी
चिरंतन तया  शांती मिळो
प्रार्थना हीच मंगेश चरणासी

सौ .राधिका काळे ,
फोन्डा ,गोवा



अशोकाच्या वाटेवर,
कुणी पसरला शोक?
टोचे देठानाच आता,
पाकळ्यांचे तीक्ष्ण टोक!

तुझे जाणे ना सामान्य,
आनंदाचा हा युगांत!
संवादिनीला असह्य,
तिच्या भात्याचा आकांत!

मंगेशाच्या मंदिरात,
देई हुंदका ओंकार!
घंटा बडवूनसुद्धा,
तिचा गोठला झंकार!

कुणी कुणाचे सांत्वन,
आता करायाचे सांग?
आसवांच्या पाठीमागे,
उभी हुंदक्यांची रांग!

कोणताही भाव नाही,
तुझ्या गाण्यातून वर्ज!
पिढ्यापिढ्याना हवेसे,
तुझे सप्तसुरी कर्ज!

दुस्वासाने ‘लता‘ शब्द,
उलटाही केला तरी!
तोही ‘ताल होतो आणि,
येई संगिताच्या घरी!




27 नभरंग

भैरवीचा फुटे बांध,
हमसून रडे नांदी!
साती स्वर वेडेपिसे,
शोधतात त्यांची दिदी!

मंगेशीच्या गाभा-यात,
ज्योत स्फुंदे समईत!
अभिषेकही तुटक,
धार विसरली रीत!

वाट पाही दिनानाथ,
त्यांच्या लेकीची स्वर्गात!
तीही चालली तृप्तीत,
अलौकिक स्वर गात!

आज क्षितिजावरती,
सूर्य उगवला नाही!
गेल्या तमात बुडून,
आंधळ्याच दिशा दाही!

प्रमोद जोशी.देवगड.९४२३५१३६०४

सगळे गाती सूर लावुनी, जीव लावुनी गातो कोण?
कवितेच्या गर्भात शिरुनी भावार्थाला भिडतो कोण?
गीतामधली भाववादळे सबल स्वरांनी झेली कोण ?

अहंकार फेकून सुरांना ममतेने कुरवाळी कोण?
नाभीतून ओंकार फुटावा तैसे सहजच गातो कोण ?
गात गाता, अक्षर अक्षर सावधतेने जपतो कोण?
शब्दांच्या पलीकडले स्पंदन सुरातुनी आळवितो कोण?

गीतामधली विरामचिह्ने, तीही बोलकी करतो कोण?
निजस्वराचा पहिला श्रोता अपुला आपण होतो कोण ?
विश्वामधल्या रसिककुळाशी सुरेल हितगुज करतो कोण?
कोण प्रश्न हा उठतो कसा.
लता म्हणा अन् गप्पा बसा.
कोण म्हणजे दुसरे कोण? लता मंगेशकर आणखी कोण?

- यशवंत देव






28 नभरंग

# त्या स्वराचे पुत्र होऊ

येत नाही गाणे तरीही
हुंदक्यानी आज गाऊ
अमृताने नाहलेल्या
सुस्वराना अर्घ्य देऊ

अर्थ आयुष्या दिला
सार्थकी झाले जिणे
त्या स्वरांचे कर्ज मोठे
मूळ ना तर व्याज देऊ

गांधार तो स्वर दैवताचा
ओंकार घन सारस्वताचा
नाद छंद परमेश्वरी
त्या गळ्याचे हार होऊ

व्याप ताप ताण सारे
या स्वरांनी दूर जाती
निश्चिंत व्हाया जीवनी
या स्वरा बाहुत घेऊ

या स्वरांच्या सावलीने
ग्रीष्म ही थंडावला
या स्वरांचा स्पर्श होता
पत्थरे झाली मऊ

मागणे काही न देवा
एव्हढे से दान दे
लाभला जर जन्म पुन्हा
या स्वरांचे पुत्र होऊ

**-प्रा.डॉ. विजय पांढरीपांडे मा. कुलगुरू**




29 नभरंग

तूच ऊठवले प्रभात समयी
गाऊन भूपाळी  छान
तुच निजवले रात्री आम्हा
अंगाई ग तुझाच मान
बालगीते ती तुझीच एकून
स्वप्नात रमलो विसरून भान
यौवनात केले पदार्पण
तुझीच गाणी ऐकत ऐकत
प्रेम कराया शिकलो मी
विरहात तू मिलनात तू
लग्नात तू मधुचंद्राच्या वेळी
मनात तू कानात तू
अंकुरल्या प्रेमाच्या साक्षीत
तुझेच गीत ओठावरती
डोहाळ्याला तू बारशाच्या सोहळ्याला तू
संसाराच्या सार्या क्षणाला तू
मरणार्याच्या प्रार्थनेत तू
देवाच्या आळवणीत तू
ये मालिक तेरे बंदे हम
सांगणारी तूच
जन पळभर म्हणणारी तूच
सार जीवन व्यापणार्या तुला
कोटी कोटी प्रणाम
तुझ्या त्या मधात भिजलेल्या स्वरतंतूना सलाम
तूच इतक दिलयस आम्ही काय देणार  तुला
एक मात्र  नक्की जगाच्या अंताला सारे ध्वनी संपतील
पण एक स्वर गुंजत राहिल
ओम् नमोजी आद्या- - -
आणि देव म्हणतील
ही तर लता जी चिरंजीवी आहे
दिदी  साष्टांग दंडवत









30 नभरंग

भूलोकीच्या सूर सागरा
तुझ्या सुरांच्या जादूने
चराचर मंत्रमुग्ध
तुझी आलापी नी तान
मन गुंग आणि धुंद
तुझ्या भक्तिगीता पुढे
देव डोलताना दिसे
भावगीतात गुंतले
कैक जीव वेडेपिसे
तुझ्या अभंगाने खुले
बंद ज्ञानीयाची ताटी
तुझ्या तरल गीताने
मन डुंबे नदीकाठी
तुझा स्वर सूर होतो
एक आनाम मोहिनी
शब्द शब्द होती गाणी
आणि तरल विराणी
किती त-हा त्या सुरांच्या,
किती कितीकते स्वर
मन भिरभिरे कधी
कधी दोले झुल्यावर
तुझ्या गाण्याचे वळण
कधी आर्तता चिरते
आणि मैफिलीत उभ्या
गच्च डोळ्यात भरते

याद त्यांची देता-देता
तू कणखर होते
कधी मीरेच्या वाटेने
आम्हा दूर देशी नेते
ऋतू कैद सारे होती
तुझ्या स्वरांच्या जाळ्यात
कधी अनवट सूर
मन गुंतते मनात
रेंगाळतो कधीमधी
गझलेचा एक फेर
गावकूस जागा होतो
तुझा लागतो ओंकार
शब्द म्हणतात माझे
अरे थांब थांब जरा
आम्हापाशी नाही बळ
गाझ सुरांची पेलया
कशी आणावी कुठून
नव्या शब्दांची पखाल
लिहिताना थांबे शब्द
आणि होतो तुझा स्वर
तुझ्या गाण्यावर खेळे
कृष्ण गोकुळात रंग
तुझ्या गरिबीच लेणं
पण किती ते देखण
तुझ्या अनाम वीरांना

मनोमनी कुर्निसात
मोद विहरला बघ
किती जीवी जीवीतत
मनमोराचा पिसारा
मनी थैमान घालतो
आणि बेभानसा वारा
तुझी साद दूर नेतो
माझी थकली लेखणी
तुझी स्वरांची पौर्णिमा
आता विसाव्याचे क्षण
पण घुमती कानात
तुझा सूर पूर होतो
कधी होतो तो आरती
माझ्या सजलेल्या वेळा
तुझ्या स्वरांच्या सांगाती
काय द्यावे दान तुला
मी रिताच फकीर
झोळी भर भरलेला
तुझ्या स्वरांचाच भार.
झोळी भर भरलेला
तुझ्या स्वरांचाच भार.

प्रविण.






जला

पाठवली पृथ्वीवरती प्रती निघाली
आहे
परत येण्या स्वगृहलोकीं तिचे
स्वागत आहे
देव आम्ही ,ज्याला म्हणती। हा
स्वर्गलोक आहे ।
परि लताला म्हणती सारे। तिचा सुर
स्वर्गीय आहे ।
कसा आहे आवाज तिचा
।ऐकावयाचा आहे
म्हणती अमृतासम कंठ जिचा ।तिला
पहायाचे आहे ।
स्वागतात नको उणीव काही ।गान
कोकिळा येत आहे ।
सजवा स्वर्गलोक सारा ।तिज हर्षित
करणे आहे ।
पृथ्वीवरती भासेल उणीव
।तिजवीण माणसा जगणे आहे ।
आपण करु आनंद साजरा ।ती
आपल्यात राहणार आहे ।।

**विद्या रानडे**



आकाशात सूर्य आहे
चंद्र आहे आणि
लता मंगेशकर चा
स्वर आहे -
पु.ल.देशपांडे






32 नभरंग

# दिदीस काव्यांजली

अनाथ झाला समुह सुरांचा,ढाळीअश्रू ढळढळा,
उडोनी गेली मैफिलीतूनी आज गानकोकिळा...

'यमन','मारवा', 'भूप' विव्हळती, शोकाकुल ' मल्हार'
'दरबारी'ची रयाच गेली ,ध्वस्त 'हमीर,' 'बहार'
आर्त विलापे 'भीमपलासी', तीव्र अंतरी कळा
उडोनी गेली मैफिलीतूनी आज गानकोकिळा...

सुर्य पहाटे अधिर होई श्रवण्या तुझी भुपाळी
अंगाईविण तुझ्या कठीण ती निद्रा संध्याकाळी
सांग जगावे कसे ईश्वरा हे दुर्भाग्य कपाळा
उडोनी गेली मैफिलीतूनी आज गानकोकिळा...

सजविलीस मखमली स्वरांनी साम्राज्ञे तू गीते
अशक्य करणे काबीज शिखरे आसनस्थ तू जेथे
स्वरसौंदर्याचे माप जे अंतिम ते दिधले तू सकला
उडोनी गेली मैफिलीतूनी आज गानकोकिळा...

जन्म मरण हा नियम सृष्टिचा खचित असे मज ठावा..
दैवी स्वरां त्या अतिव सुंदर का अपवाद नसावा
फुलवित होती स्वरलतिका ही आनंदाचा मळा...
उडोनी गेली मैफिलीतूनी आज गानकोकिळा...




33 नभरंग

´ा-यासवे डोलणारी पाने, पाहू लागली वळून.
असे काय घडले,विचारु लागले एकमेकाला,
चिमणीने घेतली गिरकी , येते विचारुन सूर्याला .
नभीच्या मोहक बिंबातून ,थेंब अश्रुंचे ओघळले,
पाहूनी पाणावलेले नयन,पंख चिमणीचे थांबले.
तिने विचारता तयाला,रवि बोलला दु:खाने ,
वेदना देऊन आपणास,स्वर गेले शांतपणाने. हळूहळू
कळले सर्वांना,श्रेष्ठ आवाज हरपला,
महान पर्व संपले, स्वरयुगाचा अंत जाहला.
हळहळले सारे स्वरप्रेमी,कोणी कोणाशी बोलेना,
नयनी दाटलेले पाणी,कसे पुसावे कळेना? उघडली
आठवणींची पेटी,स्वरमाळा शोधू लागले,
श्वासात भिनलेले सूर,
ओठांवर बागडू लागले. सर्वांना सोडूनी निघाली,
गानकोकीळा अंतिम प्रवासास,
स्तब्ध झाले आसमंत,संध्या आली भेटण्यास. दर्शन घेता
पार्थिवाचे, धुके दाटले वेदनांचे,
सुरु होता मंत्रपठण, फुटले बांध भावनांचे स्वरदैवत हे
संगीताचे, सोडूनी गेले आपणास,
दीदी आपल्यात नाही,कसे समजाऊ मनास.
ﻫ नारायण पांडव.





सर्व सूरांवर प्रभुत्व तीचे
गाणसम्राद्नी भूषवीत पद
सरस्वतीचा वरदहस्त जिथे

कोणत्या क्षणी दैवनिर्मित
ही गाणकोकीळा आली ईथे
प्रथ्वीवर सर्व जीवांना लावी
आपुल्या गाण्यांनी वेड तिथे

पन्नास-सहस्रां पेक्षा जास्त गाणी गाइलीत
बालगीते, भक्तीगीते, लोकगीते, प्रेमगीते, युगुलगीते,
गीतगुच्छे, देशभक्तीपर गीते,
तीन पिढ्यांवर राज्य तुझ्याच आवाजाचे

चलचित्रांमधील विविध नायिकेंच्या
आवाजात मिसळून तुझा स्वर
अजरामर केलीत अगणित गाणी
नायिकेंचे पाय थिरकती त्या तालावर

भारतीय जनतेच्या दैनंदिनात
तुझ्याच आवाजाची सोबत असे
तुझी गाणी लावल्याशिवाय
रेडियोचा एकही दिवस जात नसे

आहेस तू आण, बाण, शान
प्रत्येक भारतीयांच्या ह्यदयातली
सूरांच्या जगतातील सम्राद्नी तू
जणू माता सरस्वती स्वर्गातली

आज पोरके केले आम्हां सर्वांन्ना
निघालीस तू अनंताच्या वाटेवरी
सूरांच्या स्वर्गातील सूर्यच मावळ्ला
सांग पोकळी भरणार तरी कशी ?

जड अंत:करणाने श्रद्धांजली लतादीदी
तुला आम्हां सर्व पामरांकडून
लाभो मुक्ती तुझ्या आत्म्यास
विनंती ही भगवंतास दोन्ही कर जोडून !




35 नभरंग

लता मंगेशकर
ल ता वेलीवरची
गानकोकिळा कोकीळ कंठाने गायली ता ल सुरांच्या
विशाल
आकाशी ध
ध्रुवा सारखी अढळ जाहली मं गेशीच्या
कृपाप्रसादे
मागेपुढे सूर निनादले गे य, श्रद्धेय या भारतरत्नानेथ
अमृतस्वरांचे पसायदान दिले
तशत नमन करीते तुजला
साधी राहणी उच्च विचारसरणीला।।
क लेकलेनी तू केली साधना भक्ती रूपाने आराधना
रमणीय सप्तसुरांत
समरसली सहस्त्रावधी गीत सुगंधाने दरवळ्ली लता
मंगेशकर नावरूपानी
सा रे ग म प ध नि मधे रमली
लतादीदी तुजला देते ही आदरांजली लतादीदी
तुजला वाहते ही दुर्वांची जुडी
सौ. सुरेखा विजय काणे संभाजीनगर (औबाद)

लता येत आहे

जिला पाठवली पृथ्वीवरती प्री निघाली आहे प्ररत
येण्या स्वगृहलोकीप्र तिचे स्वागत आहे
देव आम्ही ,ज्याला म्हणती। हा स्वर्गलोक आहे ।
परि लताला म्हणती सारे। तिचा सुर स्वर्गीय आहे ।
कसा आहे आवाज तिचा ।ऐकावयाचा आहे
म्हणती अमृतासम कंठ जिचा ।तिला पहायाचे आहे ।
स्वागतात नको उणीव काही ।गान कोकिळा येत आहे
।
सजवा स्वर्गलोक सारा ।तिज हर्षित करणे आहे ।
पृथ्वीवरती भासेल उणीव ।तिजवीण माणसा जगणे
आहे ।
आपण करू आनंद साजरा ।ती आपल्यात राहणार
आहे ।।
विद्या रानडे




36 नभरंग

ह्मदयची हो दर्पण

भक्ती ज्योत जागवीता
जागे हरीही मंदिरी
कणकण रोमरोमी
नाद नादतो झंझिरी

बिंब सांडते तयाचे
शुद्ध सात्विक पटली
अंत:कररणात वेद
खुण मनाला पटली

वेदना की संवेदना
होत त्याच्या पायी लीन
कर्मसंचिताचे पाप
पुण्याईपुढती दीन

द्यावे झोकून स्वत:ला
तोच सांभाळीत राही
डोळा रूप ते अप्रूप
नच दुजे काही पाही

त्यास स्नेह समर्पण
चित्तभाव हो अर्पण
नाही बाहेरी बाहेरी
ह्मदयची हो दर्पण

रचना : डॉ.मंजूषा कुलकणी








37 नभरंग